दूरध्वनी : २८४ १५ ७६ / २०२ ६२ ४९ फॅक्स : २०२ ९३ ४८
ग्राम : पाणीमंडळ, मुंबई

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१

सदस्य-सचिव (प्र. व बा.अ.)

**मजीप्रा/सस/तांशा-१/३५०/२००५** **दिनांक : ८.९.२००३**

**परिपत्रक क्र. ९२**

**विषय :** म.जी.प्रा.कडून पाणी पुरवठा व मलनिःसारण योजनांची आखणी करणे व मंजूर योजनेअंतर्गत वाढीव कामे करणेसाठी स्थानीक स्वराज्य संस्थांशी सल्ला मसलत करणेबाबत..

**संदर्भ :** पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे दिनांक ११.८.२००३ चे पत्र क्र. नापापु-१००३/प्र.क्र. १०१/पापु-१९.

मजीप्राकडून पाणी पुरवठा योजनांची आखणी करीत असताना तसेच प्रगतीपथावरील योजनांमध्ये काही बदल करीत असताना किंवा मंजूर योजनेअंतर्गत अतिरिक्त कामे करत असताना ज्या स्थानिक स्वराज्य संस्थेची ती योजना असते त्यांच्याशी सल्लामसलत करणे, अधिका-यांना विश्वासात घेऊन बदलांना त्यांची मान्यता घेणे या बाबी मजीप्राच्या अधिका-यांकडून होत नसल्याबाबत प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे निदर्शनास आले आहे. या अनुषंगाने या परिपत्रकाव्दारे खालील सूचना निर्गमीत करण्यात येत आहेत.

१. कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेची पाणी पुरवठा/ मलनिःसारण योजना तयार करत असताना संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या पदाधिका-यांना/ अधिका-यांना त्या योजनेची संपूर्ण तांत्रिक तसेच वित्तीय दायीत्वाबाबतची माहिती देण्यात येऊन योजनेस त्यांची सहमती घेण्यात यावी.

२. मंजूर/ प्रगती पथावरील पाणी पुरवठा योजनेमध्ये काही बदल करावयाचे झाल्यास या बदलांबाबत ज्या स्थानिक स्वराज्य संस्थेची योजना आहे त्यांच्याशी सल्लामसलत करण्यात येवून योजनेच्या बदलाचे महत्व पटवून द्यावे व त्यांची बदलांना लेखी सहमती घेण्यात यावी. सदर बदलामूळे योजनेच्या व्याप्तीमध्ये व खर्चात वाढ/बचत मोठया प्रमाणात होत असल्यास आवश्यकतेनुसार वरिष्ठ कार्यालयाची/ शासनाची मंजूरी घेवूनच त्यानुसार पूढील कार्यवाही करावी.

→

३. मंजूर व प्रगतीपथावरील पाणी पुरवठा/ मलनि:सारण योजनांमध्ये काही अतिरिक्त अथवा वाढीव कामे करण्याचे प्रस्तावीत असल्यास सदर प्रस्ताव वरीष्ठ कार्यालयास सादर करण्यापूर्वी या अतिरिक्त प्रस्तावांची कल्पना स्थानिक स्वराज्य संस्थेस देऊन त्या प्रस्तावास त्यांची लेखी सहमती घेण्यात यावी.

४. योजनेच्या खर्चामध्ये मंजूर किंमतीपेक्षा वाढ होणार असल्यास या वाढीव खर्चाची पूर्व कल्पना स्थानिक स्वराज्य संस्थेस देण्यात यावी व हा खर्च आवश्यक असल्याचे त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे.

उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. उपरोक्त सूचना या परिपत्रकाच्या दिनांकापासून लागू होतील.

( दीपक भोसाळे )
सदस्य सचिव

प्रत : मा. मंत्री, ग्राम विकास पाणी पुरवठा व स्वच्छता तथा अध्यक्ष, मजीप्रा यांचे माहितीसाठी सादर.
प्रत : मा. राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा उपाध्यक्षा, मजीप्रा, यांचे माहितीसाठी सादर.
प्रत : मा. राज्यमंत्री, नगरविकास तथा उपाध्यक्ष, मजीप्रा, यांचे माहितीसाठी सादर.
प्रत : प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांना माहितीसाठी सादर.
प्रत : वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी, मजीप्रा, यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
प्रत : सर्व मुख्य अभियंता, म.जी.प्रा., यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
प्रत : सर्व अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा. मंडळ, यांचे माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
प्रत : सर्व कार्यकारी अभियंता, मजीप्रा, यांचे माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.

इगाडे/बागरी